सरतपास श्री. ए. एम. चन्तापुरे वकील गै.अ.तर्फे:–

०३. आता मला मी प्रकरणामध्ये दाखल सि. ११ वरील शपथपत्र दाखविले त्यातील मजकुर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे, त्यावर माझी सही आहे. आता मला प्रकरणामध्ये दाखल दिनांक ३१/१२/२०२० रोजी संचालक मंडळाच्या सभेमध्ये घेतलेल्या ठराव क्रमांक २९ ची सत्य प्रत दाखवीली त्यावर माझी प्रभारी व्यवस्थापक प्रशासन व मानव संसाधन विभाग म्हणून सही आहे त्यास **नि. सी–१६** देण्यात येत आहे. आता मला प्रकरणामध्ये दाखल दिनांक २९/०५/२०२३ रोजी संचालक मंडळाच्या सभेमध्ये घेतलेल्या ठराव क्रमांक ४४ (१) ची सत्य प्रत दाखवीली त्यावर माझी प्रभारी व्यवस्थापक प्रशासन व मानव संसाधन विभाग म्हणून सही आहे त्यास **नि. सी–१७** देण्यात येत आहे.

उलट तपास श्री खेळकर वकील अर्जदारातर्फे :

०४. मी गैरअर्जदार या बॅकेमध्ये नोव्हेंबर२०२० पासून मॅनेजर म्हणून कार्यरत आहे. हे म्हणने खरे आहे की मी सदर बॅकेमध्ये मॅनेजर या पदावर येण्यापूर्वी अर्जदार हे दिनांक ३०.०६.२०२० रोजी सेवानिवृत्त झाले होते. हे म्हणने खरे आहे की माझे आधी श्री वानखडे हे मॅनेजर म्हणून कार्यरत होते. हे म्हणने खरे आहे की २०१९–२०२० मध्ये महाराष्ट्र शासना तर्फे कर्ज माफी चालू होती. आमच्या बॅकेमध्ये आता कर्मचा–याची मंजूर पदे ही ८८५ आहेत. व प्रत्यक्षात आजच्या घडीला ४५७ पदे भरलेली आहे. सन २०१९–२० या वर्षामध्ये कीती पदे भरलेली होती हे मी सांगू शकत नाही. हे मला माहीत नाही की कर्जमाफीचे काम युध्द पातळीवर करायचे असल्यामुळे अर्जदार याना ते सेवा निवृत्त झाल्यानंतरही सदर काम करण्याचे सांगीतले होते. हे म्हणने खरे आह की आमचे बॅंकेचे कर्मचा–याच्या सेवा शर्तीचे नियम आहे. हे म्हणने खरे आहे की सदर सेवा नियम हे बॅक आणी कर्मचारी संघटना यांचेमध्ये झालेल्या करारानुसार केलेले आहे. हे म्हणने खरे आहे की बॅक व कर्मचा–यांचा सेवा नियमा बाबतचा लेखी करार हा स्टॅम्प पेपरवर झाला होता. हे म्हणने खरे आहे की त्यावेळेस बॅंकेचे अध्यक्ष श्री. शेखर धोटे, मख्य कार्यकारी अधिकारी श्री खेडीकर, संघटनेचे अध्यक्ष श्री. बरबटकर व जनरल सेक्रटरी श्री धोत्रे हे

होते. हे म्हणने खरे आहे की सदर करारनाम्यानुसार बॅंकचे धोरण आजही चालू आहे. हे म्हणने खरे आहे की नि. यु १३ नुसार आम्ही अर्जदाराला सुट्या उपभोगू शकता याबाबत पत्र दिले होते. हे म्हणने खरे आहे की निशाणी यु–१८ वरील पत्र बॅंकेचे प्रभारी व्यवस्थापक यांनी अर्जदार यास दिलेले असून त्यामधील नमूद मजकूर बरोबर आहे. हे म्हणने खरे आहे की निशाणी यु–१९ वरील सेवा निवृत्तीच्या दाखल्यानुसार अर्जदाराला आम्ही दिनांक ३० जून २०२० रोजी सेवा निवृत्त केले आहे. अर्जदाराने त्याच्या खात्यात जमा असलेल्या एकुण २४४ दिवसाच्या सुट्या न देता काम केले आहे याबाबत मी दस्त पाहल्याशिवाय काही सांगु शकत नाही. हे म्हणने खरे आहे की अर्जदाराने आम्हाला त्यांचे अधिवक्ता मार्फत दिनांक १८/१२/२०२० रोजीची नोटीस पाठवीली होती. हे म्हणने खरे आहे की सेवानिवृत्तीच्या वेळेस अर्जदाराचा पगार हा ८२७६५/– रुपये ऐवढा होता. आता मला अर्जदाराने दाखल कर्मचा–यांच्या पगाराचा जून २०२० रोजीचा सिंधेवाई शाखेचा पगाराचा तक्ता दाखवीला त्यानुसार अर्जदाराचा पगार हा ८२,७६६/– रुपये नमूद केलेला आहे. सदर दस्तावर बॅंकचे व्यवस्थापक व क्लर्क / बॅंकींग ऑफीसर ग्रेड–२ यांची सही आहे. त्या मी ओळखतो. त्यामधील मजकूर बरोबर आहे. त्या निशाणी **क्रमांक यु–१८** देण्यात येते.

५. हे म्हणने खरे आहे की अर्जदार यानी आमचे बॅंकेला त्यानीही सुट्यांच्या काळात काम केलेले असल्यामुळे त्या काळाच्या पगाराची सेवा नियमानुसार मागणी केली आहे. हे म्हणने खरे आहे की सदर अर्जदाराच्या नोटीसीला आम्ही अधिवक्ता शेख यांच्या मार्फत उत्तर दिले होते. हे मला माहीत नाही की आम्ही अर्जदाराने दिलेल्या नोटीसाच्या उत्तरामध्ये अर्जदाराने एकुण ३०.१०.२०१९ ते ३०.०६.२०२० पर्यन्त काम केल्याचे नमूद केले आहे. हे म्हणने खरे आहे की दिनांक १०.०२.२०२१ रोजी माझेकडे प्रशासकीय व्यवस्थापक म्हणून चार्ज होता. हे म्हणने खरे आहे की मी अर्जदाराने दिलेल्या नोटीसला दिनांक १०.०२.२०२१ रोजीचे उत्तर देण्याकरीता मी आमचे अधिवक्ता याना माहीती दिली होती. आम्ही सदर प्रकरणामध्ये आमच्या दाखल केलेल्या लेखी बयाणावर श्री. एम. व्ही. पोटे यांची सही आहे. त्यावेळेस ते प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी होते.

प्र तूम्ही सदर प्रकरणामध्ये दाखल केलेल्या तुमच्या लेखी बयाण मधील मजकूर बरोबर आहे?

उत्तर सदर लेखी बयाणावर श्री एम.व्ही. पोटे यांची सही असल्यामुळे त्याबाबत मला माहीती नाही.

०६. हे म्हणने खरे आहे की आम्ही अर्जदाराला तो ३ महीन्याच्या पगाराकरीता पात्र आहे हे कळवीले होते. हे म्हणने खरे आहे की अर्जदाराने दि २१.०१.२०२२ रोजी रजा न उपभोगता केलेल्या कामाचा पगार मीळण्याबाबत आम्हाला पत्र दिले होते. आता मला ते पत्र दाखवीले. ते पत्र तेच आहे त्यास **नि. यु—१९** देण्यात येते. हे म्हणने खरे आहे की नि. यु १९ मधील पात्रातील मागणीनुसार आम्ही अर्जदाराच्या खात्यामध्ये त्याचा ३ महीन्याचा पगार जमा केला नाही. सदर ३ महीन्याचा पगार अर्जदाराचे खात्यात जमा न करण्याचे कारण असे आहे की संचालक मंडळाच्या दि. ३१.१२.२०२० चे ठराव क्र. २९ नुसार अर्जदाराच्या रजेचा पगार देवू नये असा निर्णय घेण्यात आला होता. हे म्हणने खरे आहे की दि. ३१.१२.२०२० च्या ठरावाच्या पूर्वी दिनांक ३०.०६.२०२० रोजी अर्जदार सेवानिवृत्त झाला होता. हे म्हणने खरे नाही की त्यामुळे अर्जदाराला सदर ठराव लागू होत नाही.

०७. बॅंकेच्या एकूण ७—८ कमीटी आहेत. हे म्हणने खरे आहे की स्टाफ कमीटी, कार्यकारी कमीटी, संचालक मंडळ आहेत त्यामधील संचालक कमीटी ही मुख्य कमीटी आहे.

प्र कर्मचा—याचे प्रोमोशन, बदली व देणे घणे याबाबतचे विषय स्टाफ कमीटी समोर ठेवल्या जातात?

उम्मर : वरील नमूद विषयापैकी प्रोमोशन, बदली बाबतचे विषय स्टाफ समीती समोर ठेवल्या जातात व कर्मचा—याचे देणे घेणे बाबतचा विषय हा कार्यकारी समीतीसमोर ठेवल्या जातो.

०८. कर्मचा—याचे संबंधातील कुठले विषय कुठल्या समीतीसमोर ठेवण्यात यावे याबाबतचे मार्गदर्शक सुचना आहे. कर्मचा—याचे देणे घेणे बाबतचा विषय हा कार्यकारी समीतीसमोर ठेवला जातो या बाबतचे परिपत्रक मी प्रकरणात दाखल केलेले नाही. बॅंकेच्या सेवो नियमावली मध्ये कोणताही बदल झालेला नाही. हे म्हणने खरे नाही की अर्जदाराचा पगार न देण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार संचालक मंडळाला नाही.

प्र बॅंक व कर्मचारी संघटना यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार कर्मचा—याच्या खाती शिल्ल्क असलेल्या रजेचा पगार देण्याचा नियम आहे?

उत्तर फक्त ९० दिवसाच्या रजो पगार देण्याचा अधिकार आहे.

प्रकरण पुढील उलटतपासाकरीता तहकूब :

माझे समक्ष

स्वा/—

(श्रीमती रू.वि. मेटे)

न्यायाधीश

कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. ११.०७.२०२४.